"कन्या सुकन्या कर्तव्या"

वुईमेन्स एज्युकेशन सोसायटी, सांगली

# श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

दिनांक: १५/१२/२०२१

## सिनिअर व पी.जी. राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व ज्युनिअर, सिनिअर व पी.जी. एस.सी.,एस.टी.,ओ.बी.सी.,एस.बी.सी. व व्ही.जे.एन.टी.शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सुचना २०२१-२२

**http://mahadbtmahait.gov.in**

महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ई.बी.सी., एस.सी., एस.टी., ओबीसी.,एसबीसी. व व्हीजेएनटी या प्रवर्गामधील भारत सरकारशिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरण्याकरिता वेबसाईट चालु झालेली आहे. तरी ई.बी.सी., एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., एस.बी.सी. व व्ही.जे.एन.टी.या प्रवर्गात प्रवेश घेतलेल्या अनुदानित व विनाअनुदानित तुकडीतील सर्व विद्यार्थिनींनी ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत. ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क व एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., एस.बी.सी. व व्हीजेएनटी प्रवर्गातील सर्व विद्यार्थिनींनी भारत सरकारशिष्यवृत्तीचा अर्ज भरणे बंधनकारक आहे. ज्या विद्यार्थिनींनी अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थिनींनी महाविद्यालयाची संपूर्ण फी भरले नंतर परीक्षाहॉल तिकीट दिले जातील. तसेचशिष्यवृत्ती ऑनलाईन अर्जाचीप्रिंट व आवश्यकते सर्व कागदपत्रे जोडून महाविद्यालयात दि.:२९/०१/२०२२ पर्यंत श्री. जंगम एन. बी. यांचेकडे जमा करावयाचे आहेत. ज्या विद्यार्थिनींनी दिलेल्या मुदतीत शिष्यवृत्ती अर्ज भरणार नाहीत. अशा विद्यार्थिनींनी महाविद्यालयाची संपूर्ण फी भरावी लागेल.

***मागील वर्षी ई.बी.सी. व शिष्यवृत्ती अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज रिन्युअल करून महाविद्यालयाकडे फॉरवर्ड करणे आवश्यक आहे.***

*खालील सर्व कागदपत्रे ओरिजनलचP.D.F. किंवा JPEG मध्येस्कॅनकरून अपलोडकरणेचे आहेत.*

*झेरॉक्स किंवा चुकीचीकागदपत्रे अपलोडकेल्यास शिष्यवृत्ती अर्ज स्विकारले जाणार नाहीत.*

*खालील प्रमाणेकागदपत्रांचाक्रम लावून शिष्यवृत्ती अर्ज जमा करावा.*

१. युजरआयडी व पासवर्ड प्रिंट
२. शिष्यवृत्ती अर्ज (ऑनलाईन भरलेल्या आर्जाचीप्रिंट)
३. उत्पन्नाचा दाखला (मा.तहसिलदार यांचा २०२०-२१)
४. डोमेसाईल प्रमाणपत्र झेरॉक्स सत्यप्रत
५. जातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate) (एस.सी.,एस.टी.,ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थ्यांसाठी)
६. आई/ वडील हयात नसलेस त्यांचा मृत्युचा दाखला
७. इयत्ता १० वी पासून विद्यार्थी शिकत असलेल्या मागील वर्षापर्यंतच्या सर्व गुणपत्रिका झेरॉक्स सत्यप्रत
(परीक्षा अनेकवेळी दिली असलेस सर्व गुणपत्रक झेरॉक्स)
८. शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ ची प्रवेश पावती
९. आधारकार्ड झेरॉक्स सत्यप्रत

१०. प्रतिज्ञापत्र व रेशनकार्ड झेरॉक्स सत्यप्रत

११. बँकेकडून आधार संलग्न झाल्याचे स्लिप/पोहच पावती

१२. बँक पासबुक झेरॉक्स सत्यप्रत

१३. मागील वर्षी गॅप असलेस रू. १००/- च्या बॉण्ड वर ॲफिडिव्हेट

१४. मागील शाळा /महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत

## अपत्यांमध्येदोनच्या पुढेनंबर असणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑफीसमध्ये माहिती घेऊनच फॉर्म भरणेचे आहेत.

- ***सर्व कागदपत्रे ऑनलाईन दिसतात याचीखात्रीकरूनच अर्ज महाविद्यालयाकडे पाठवावेत.***
- ***सर्व ओरिजनलकागदपत्रेPDF/JPEG मध्येस्कॅनकरून ऑनलाईन अपलोड करावेत.***
- ***विद्यार्थ्यांनी स्वत:चा प्रवेश अनुदानित किंवा विनाअनुदानित मध्ये आहे याचीखात्रीकरून त्या विभागामध्येच अर्ज करावा.***
- ***विद्यार्थ्यांनी स्वत:चा अर्ज स्वत: चेककरूनच महाविद्यालयाकडे ऑनलाईन पाठवावा. जरकाही माहिती अपूर्ण असलेस किंवा चुकीची माहिती भरली गेली असलेस अर्जामध्ये दुरूस्तीहोत नसल्यामुळेकोणत्याही परिस्थितीत अर्ज परत पाठवले जाणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिलेस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.***
- ***जे विद्यार्थी ऑनलाईन भरलेला अर्ज महाविद्यालयात जमा करणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सवलत मिळणार नाही.***
- ***ऑनलाईन अर्जामध्ये चुकीची व खोटी माहीती भरलेस होणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस विद्यार्थी व पालक स्वत: जबाबदार राहतील.***
- ***अपूर्ण अर्ज महाविद्यालयात कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.***
- ***सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्सची सत्यप्रत True Copy किंवा Self Attestedकरणे आवश्यक आहे.***

१. वरील प्रमाणेमूळकादपत्रांच्या **सर्व अक्षरे दिसतील असे झेरॉक्सकाढून त्या सत्यप्रत (True Copy)/ Self Attestedकरणे आवश्यक आहे.** वरील प्रमाणेकोणतेहीकागपत्रे **विद्यार्थिनींनी** कडे उपलब्ध नसेलतर शिष्यवृत्ती अर्ज भरला जाणार नाही.

२. शिष्यवृत्ती अर्ज जमा करतेवेळी आधार कार्ड व बँक खात्याशीलिंककेलेला मोबईल नंबर जवळ असणे आवश्यक आहे.

३. **विद्यार्थिनींने** शिष्यवृत्ती अर्जावर आपला Permanent मोबाईल नंबर देणेगरजेचे आहे. तसेचतो मोबाईल नंबर बॅंक खात्याशी व आधारकार्डशी संलग्न (Link) केलेला असणे आवश्यक आहे.

४. **विद्यार्थिनीं** चा मोबाईल नंबर नियमित चालू असणेगरजेचे आहे. तसेचसदर मोबाईल वर शिष्यवृत्तीचे मेसेजेस येणार असल्यामुळे मोबाईल नंबर बदलू नये. जरकाही कारणास्तव **विद्यार्थिनींनी** मोबाईल नंबर बदलला असल्यास व काही आर्थीक नुकसान झालेस **विद्यार्थिनीं** स्वत: जबाबदार राहील.

५. **विद्यार्थिनींनी**मागील वर्षाच्या ओरिजनलगुणपत्रकाच्या झेरॉक्स प्रति देणे आवश्यक आहे. (नेटप्रिंट स्विकारली जाणार नाही)

६. **विद्यार्थिनींचे** बॅंक खाते **चालू स्थितीत** असणे आवश्यक आहे.

७. सर्व **विद्यार्थिनींनी** डोमेसिएल देणे आवश्यक आहे.

८. **विद्यार्थिनींनी** वरील सर्व सुचनांचेकाटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे व दिलेल्या सुचनेनुसार सर्व कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे. काही कारणास्तव **विद्यार्थिनींचा** शिष्यवृत्ती अर्ज नामंजुर झालेस व **विद्यार्थिनींनी** सुचना देऊनहीकार्यालयाशीसंपर्क न साधल्यास होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

९. **स्कॉलरशिप फॉर्म भरण्याची अंतिम तारीख २९ जानेवारी २०२२ आहे.**

**डॉ. आर. जी. कुलकर्णी**
**प्राचार्य**

**विद्यार्थिनींना सर्व सुचना महाविद्यालयाच्या (www.mgkanyasangliedu.in) या वेबसाईटवर दिल्या जाणार असल्याने विद्यार्थ्यांनी वेळोवेळी महाविद्यालयाची वेबसाईट पाहणे आवश्यक आहे.**